## Terms & Conditions / नियम व अटी :-

1. परीक्षेसंदर्भात परीक्षा केंद्रावर ने-आण करण्यासह आपल्या पाल्याची सर्व जबाबदारी संबंधित पालकांची असेल.
2. मंथन वेलफेअर फाऊंडेशनच्या अधिकृत समन्वयकाची ओळख पटवुनच त्याकडे परीक्षा फी जमा करून अर्जासोबत जोडलेली पोहोच पावती घ्यावी.
3. परीक्षा केंद्र तालुक्याच्या ठिकाणी अथवा तालुक्यातील सोयीच्या ठिकाणी असेल.
4. परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्रावर अचानक काही अन्य कार्यक्रम आयोजित केला गेल्यास पर्यायी केंद्राची व्यवस्था केली जाईल त्यामुळे परीक्षा अर्धा किंवा एक तास उशिरा सुरू होण्याची शक्यता असते, अशावेळी आमच्या समन्वयकांना सहकार्य करणे आवश्यक आहे.
5. काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षा केंद्र उपलब्ध न झाल्यास संबंधित परीक्षा केंद्रावरील विद्यार्थ्यांच्या परीक्षा तारखेत बदल करण्याचा अधिकार परीक्षा आयोजकांना राहील.
6. परीक्षेचा निकाल मंथन वेलफेअर फाउंडेशनच्या www.manthanwelfarefoundation.org या संकेत स्थळावर पहावयास मिळेल परीक्षार्थीला अंतिम परीक्षेची अंतिम उत्तर सुची व त्याने सोडविलेली उत्तरपत्रिका पण पाहावयास मिळेल व प्रिंट काढता येईल.
7. परीक्षा केंद्रावर जागेअभावी बेंचेस उपलब्ध न झाल्यास परीक्षार्थीला जमिनीवर बसावे लागेल यासाठी विद्यार्थ्याने पॅड व इतर परीक्षा विषयक साहित्य बरोबर आणणे आवश्यक आहे.
8. काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षार्थींना बैठक व्यवस्थेसाठी शाळा उपलब्ध न झाल्यास परीक्षार्थींची परीक्षा ही भारतीय बैठक पद्धतीने एखाद्या सांस्कृतिक/ खाजगी सभागृहात अथवा खुल्या मैदानात आयोजित केली जाईल.
9. परीक्षेच्या दिवशी इतर कोणत्याही संस्थेमार्फत अन्य परीक्षा आयोजित केल्या गेल्या असतील तर अशा विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था केली जाणार नाही.
10. प्रवेश अर्जात भरलेली माहिती टाईप झाल्यानंतर विद्यार्थी /पालकांना वेळोवेळी एसएमएस द्वारे (what's app or text message) दिली जाते तसेच परीक्षा अगोदर देण्यात येणाऱ्या प्रवेश पत्रावरील मुद्रित सर्व माहिती तपासून घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी व पालकाची असेल.
11. प्रत्यक्ष परीक्षेवेळी विद्यार्थ्याला वाटप झालेली प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका आपल्या इयत्ता, माध्यमाप्रमाणे आली आहे का? हे पाहून घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल. परंतु विद्यार्थी वयोगट लहान आहे, परीक्षा वेळी अनावधानाने परीक्षा प्रणाली कडून काही चूक झाल्यास व ती वेळेत लक्षात आल्यास परीक्षा केंद्रावरच योग्य ती कारवाई केली जाईल व लक्षात न आल्यास नंतर परीक्षा विभाग विद्यार्थ्याच्या हितासंदर्भात जो निर्णय घेईल तो मला मान्य असेल. त्याबाबत माझी काही तक्रार नसेल.
12. पारितोषिकांच्या संदर्भातील सर्व हक्क परीक्षा आयोजकांकडे राखून ठेवले आहेत. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या सहभागी विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार कमी-जास्त करण्याचा अधिकार आयोजकांना राहील. बक्षिस रक्कम बक्षिसपात्र विद्यार्थ्याच्या / पालकाच्या बँक खात्यावरच जमा केली जाईल. (चेक किंवा ऑनलाईन बँकींगच्या माध्यमातून) त्यासाठी पालकाने अधिकृत संकेतस्थळावर बँक खात्याची माहिती (खाते क्रमांक व IFSC कोड) दिलेल्या मुदतीत देणे बंधनकारक आहे.
13. चालू शैक्षणिक वर्षात (2024-25) काही अपरिहार्य परिस्थितीनुसार लेखी परीक्षा घेण्यास समस्या असेल तर आपली परीक्षा ऑनलाइन व्हिडिओ व आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रॉक्टरद्वारे नियंत्रित स्वरूपात आयोजित करणार आहोत. ऑनलाइन परीक्षा विषयक नियम व अटी आपणास कळविल्या जातील. ऑनलाइन परीक्षा ही ऐच्छिक स्वरूपाची असेल. ऑनलाईन परीक्षेच्या अभ्यासक्रमात व परीक्षा कालावधीत अंशतः बदल होऊ शकतो. परीक्षार्थी ऑनलाईन परीक्षा देण्यास इच्छुक नसल्यास त्याने भरलेले प्रवेश परीक्षा आवेदन शुल्क रू. पन्नास फक्त परत करण्यास संस्था बांधील असेल.
14. एका परीक्षार्थी विद्यार्थ्याला राज्यस्तरीय, जिल्हा/विभागस्तरीय किंवा केंद्रस्तरीय यांपैकी फक्त एकच बक्षीस दिले जाईल.
15. जिल्हा/विभागस्तरीय बक्षिसासंदर्भात संबंधित जिल्ह्यातील परीक्षार्थी संख्येनुसार वैध व निकोप स्पर्धा निर्माण होवून योग्य गुणवत्ता यादी तयार व्हावी यासाठी काही जिल्हे एकत्र करून विभागाची निर्मिती केली जाईल. अशा विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करताना ती जिल्हा गुणवत्ता यादी न करता विभागीय गुणवत्ता यादी तयार केली जाईल.
16. मंथन वेलफेअर फाऊंडेशन ही नोंदणीकृत सामाजिक उत्तरदायित्व असलेली एक स्वतंत्र संस्था असल्यामुळे संस्थेच्या स्पर्धा परीक्षा विभागाने आयोजित केलेल्या खाजगी परीक्षांच्या नियोजनात बदल करण्याचा अधिकार परीक्षा आयोजकांना राहील. मंथन वेलफेअर फाउंडेशन या संस्थेस महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे परीक्षा आयोजनास मान्यता असलेले परवानगी पत्र मी अभ्यासले असून मला ते संपूर्णत: समजले आहे. यासाठी परीक्षा आयोजनास लागणारे परीक्षा शुल्क रुपये पन्नास फक्त मी पालक म्हणून स्वखुशीने देत आहे. त्यापोटी मला परीक्षा फी फॉर्म पोहोच पावती मिळाली आहे.
17. परीक्षा तयारीसाठी खरेदी केलेले विविध प्रकाशनाचे अवांतर परीक्षा साहित्य (मार्गदर्शक, सराव प्रश्नपत्रिका संच इ. तसेच खाजगी कोचिंग क्लासेस, ऑनलाईन क्लासेस, ऑनलाईन टेस्टस् इ.) रकमेचा मंथन वेलफेअर फाउंडेशन च्या परीक्षा फी शी कुठलाही संबंध नाही याची मला जाणीव आहे.
18. परीक्षेचा काठिण्यस्तर शालेय अभ्यासक्रमास पूरक असून यामुळे परीक्षार्थीवर अभ्यासाचा कोणताही अतिरिक्त ताण पडणार नाही, याउलट त्याच्या गुणवत्तेत वाढ होईल याची मला व माझ्या पाल्याला पूर्ण जाणीव आहे.
19. मी (पालक) परीक्षार्थी विषयी ऑफलाईन परीक्षा प्रवेश अर्जात कोणतीही चुकीची माहिती दिल्यास परीक्षा प्रक्रियेतील कोणत्याही स्तरावर परीक्षार्थीला संपूर्ण प्रक्रियेतून वगळण्यात येईल याची संपूर्ण जबाबदारी माझी पालक म्हणून राहील, अशा परिस्थितीमध्ये माझ्या पाल्याची परीक्षा शुल्क रक्कम परत मिळणार नाही, हे मला मान्य आहे.
20. कृपया तुमच्या तक्रारी व सुचना लेखी स्वरूपात मंथन वेलफेअर फाउंडेशनच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात.
21. परीक्षेसंदर्भात सर्व कायदेशीर बाबी जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांच्या कार्यक्षेत्र अंतर्गत येतील.
22. वरील परीक्षेविषयीच्या सर्व नियम व अटी मी (पालक) वाचल्या असून त्या आम्हाला मान्य आहेत व त्यांच्याशी आम्ही (पालक व विद्यार्थी) पूर्ण सहमत आहोत.

| STUDENT'S SIGN<br>विद्यार्थ्याची सही | PARENT'S SIGN<br>पालकाची सही | CO-ORDINATOR SIGN<br>अधिकृत परीक्षा समन्वयकाची सही |
|---|---|---|



**मंथन वेलफेअर फाऊंडेशन**
स्पर्धा परीक्षा विभाग : 9922950627
परीक्षा विषयक शंका निरसन संपर्क : 9130093832
रजि. ऑफिस : बी-6, करण कोर्ट, जुने कोर्ट गल्ली, अहमदनगर. पिन - 414 001.
☎ 0241-2322002 Website : www.manthanwelfarefoundation.org

परीक्षा परवानगी पत्र क्र.-क्र.प्रशिसं/संकीर्ण/मंथनवेलफेयरफा.सामान्यज्ञानपरीक्षा२०१९-२०/५१६/११२७२/३५५५

शासनमान्य

# मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा

इ. 1 ली ते इ. 8 वी
(माध्यम : मराठी, इंग्रजी व सेमी-इंग्रजी)



- राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, केंद्रस्तरीय पारितोषिक रचना (प्रमाणपत्र व स्मृतीचिन्हासह)
- अत्याधुनिक ऑनलाईन परीक्षा व्यवस्थापन (विद्यार्थी प्रोफाईल, प्रवेशपत्र, सोडविलेली उत्तरपत्रिका, निकाल विश्लेषणासह)
- कार्बनलेस उत्तरपत्रिका व पारदर्शक परीक्षा व्यवस्थापन.

# MGKE 2024-25

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात स्पर्धा परीक्षा हाच आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्याचा सर्वांत सोपा मार्ग आहे. या द्वारेच आपण आपल्या ज्ञानाची पातळी, दर्जा पारखू शकतो. म्हणूनच भविष्यातील अनेक स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारीसाठी प्राथमिक शिक्षण अवस्थेत सामान्यज्ञान पारखणाऱ्या प्रज्ञाशोध परीक्षा आवश्यक आहेत. **'मंथन वेलफेअर फाऊंडेशन'** ही एकमेव संस्था भविष्यातील या सर्व आव्हानांचा विचार करुन स्पर्धा परीक्षा आयोजन करते.

### - परीक्षा फॉर्म भरण्याची पद्धती -

**Offline** - स्थानिक प्रतिनिधीकडून (समन्वयक) प्रवेश अर्ज प्राप्त करून, अचूक भरून पुन्हा त्याच प्रतिनिधीकडे जमा करू शकता.

### - परीक्षा नियोजन -

**परीक्षा फॉर्म भरण्याची मुदत - दि.** 15/09/2024 **पर्यंत, विलंब शुल्कासह मुदत - दि.** 30/09/2024 - **(रू.** 50/- **विलंब शुल्क)**
(अंतिम मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेश अर्ज स्विकारला जाणार नाही.)
**परीक्षा दिनांक : रविवार, दि.** 02/02/2025 । **परीक्षा निकाल : शनिवार, दि.** 29/3/2025

### - पारितोषिक वितरण समारंभ -

**राज्यस्तरीय पारितोषिक वितरण - रविवार, दि.** 27/4/2025 **रोजी होईल.**

अधिकृत समन्वयक

**मंथन वेलफेअर फाऊंडेशन**
रजि. ऑफिस : बी-६, करण कोर्ट, जुने कोर्ट गल्ली, अहमदनगर - 414 001.
परीक्षा विषयक कामकाजासाठी शिक्षक/पालकांसाठी संपर्क : 9130093832
स्पर्धा परीक्षा विभाग : 9922950627 ☎ 0241-2322002
www.manthanwelfarefoundation.org

मंथन वेलफेअर फाऊंडेशन संचलित

## मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षा (M.G.K.E.) - 2025

(अभ्यासक्रम व विषयनिहाय प्रश्नसंख्या)

| इयत्ता | पेपर | अभ्यासक्रम व विषयनिहाय प्रश्नसंख्या | प्रश्न | गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| इ.1 ली व इ. 2 री MGKE | 1 | मराठी (15 प्रश्न) + गणित (25 प्रश्न) + इंग्रजी (10 प्रश्न) + बुध्दिमत्ता चाचणी (25 प्रश्न) | 75 | 150 | $1\frac{1}{2}$ तास |
| इ. 3 री ते इ. 8 वी MGKE | 1 | मराठी (25 प्रश्न) + गणित (50 प्रश्न) | 75 | 150 | $1\frac{1}{2}$ तास |
| | 2 | इंग्रजी (25 प्रश्न) + बुध्दिमत्ता चाचणी (50 प्रश्न) | 75 | 150 | $1\frac{1}{2}$ तास |

### ✲ परीक्षा नियम व अटी –

- प्रवेश अर्जावर परीक्षा विषयक सर्व नियम व अटी दिलेले असून त्या परीक्षार्थीने व त्याच्या पालकाने समजावून घेणे आवश्यक असेल.
- प्रश्नपत्रिकेबरोबर उत्तरे सोडविण्यासाठी OMR उत्तरपत्रिका दिली जाईल व ती पेपरच्या वेळेनंतर जमा केली जाईल.
- काही आपत्कालीन परिस्थितीत लेखी परीक्षा आयोजन अशक्य असल्यास आपण online परीक्षेचे आयोजन करणार आहोत. परीक्षा online असल्याने तिची पारदर्शकता व विश्वासार्हता टिकविणे परीक्षार्थीवर बंधनकारक असेल.

### ✲ परीक्षा वेळापत्रक – रविवार, दि. 02/02/2025

| | इ. 1 ली व 2 री | इ. 3 री ते इ. 8 वी |
|---|---|---|
| पेपर | वेळ | वेळ |
| पेपर पहिला | 12:00 ते 1:30 | 12:00 ते 1:30 |
| पेपर दुसरा | - | 2:30 ते 4:00 |

(काही अपरिहार्य कारणांमुळे परीक्षा स्वरूप, पेपर वेळापत्रक व परीक्षा तारखेत बदल होऊ शकतो.)

## – पारितोषिके –

**इ. 1 ली ते इ. 8 वी**

**– राज्यस्तरीय पारितोषिके –**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | – ₹ | 7000/- |
| द्वितीय क्रमांक | – ₹ | 6000/- |
| तृतीय क्रमांक | – ₹ | 5000/- |
| चतुर्थ क्रमांक | – ₹ | 4000/- |
| पाचवा क्रमांक | – ₹ | 3000/- |

**– जिल्हा/विभागस्तरीय पारितोषिके –**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | – ₹ | 2000/- |
| द्वितीय क्रमांक | – ₹ | 1500/- |
| तृतीय क्रमांक | – ₹ | 1250/- |
| चतुर्थ क्रमांक | – ₹ | 1000/- |
| पाचवा क्रमांक | – ₹ | 750/- |

**राज्यस्तरीय व जिल्हा/विभागस्तरीय पारितोषिके :**

प्रत्येक इयत्तेच्या बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना समान गुण असतील तर राज्यस्तरीय व जिल्हा/विभागीय पारितोषिक रक्कम विभागून दिली जाईल. विभागून दिलेली राज्यस्तरीय पारितोषिक रक्कम ही कमीत कमी ₹ 400/- प्रति विद्यार्थी असेल. जिल्हा/विभागीय पारितोषिक रक्कम ही कमीत कमी ₹ 300/- प्रति विद्यार्थी असेल. संबंधित जिल्ह्याच्या सहभागी विद्यार्थी संख्येनुसार निकोप स्पर्धा व्हावी या उद्देशाने काही जिल्हे एकत्रित करून पारितोषिकांसाठी विभागस्तर निर्माण केला जाईल. पारितोषिक रक्कम अकाऊंट पेई चेकने किंवा विद्यार्थी/ पालकाच्या खात्यावरच जमा केली जाईल. सर्व बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्हाने गौरविण्यात येईल.

**केंद्रस्तरीय पारितोषिके :** प्रत्येक इयत्तेची केंद्रनिहाय 300 विद्यार्थी संख्या प्रमाण मानून त्यामध्ये जास्तीत जास्त 7 व्या क्रमांकापर्यंत अथवा एका इयत्तेची 300 पेक्षा विद्यार्थी संख्या कमी असेल, तर इयत्तेनुसार विद्यार्थी संख्येच्या 5% पारितोषिके गुणानुक्रमानुसार दिली जातील. बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना पारितोषिक रक्कम अकाऊंट पेई चेकने किंवा विद्यार्थी/ पालकाच्या खात्यावर जमा केली जाईल. गुणानुक्रमांक 1 ते 3 करिता ₹ 200/- व गुणानुक्रमांक 4 ते 7 करिता ₹ 150/- प्रति विद्यार्थीप्रमाणे स्मृतीचिन्हासह दिली जाईल.

पारितोषिक प्राप्त परीक्षार्थीला पारितोषिक रक्कम हवी नसल्यास पालकाच्या संमतीने परीक्षार्थीला तेवढेच पारितोषिक मूल्य असलेल्या वाचनीय पुस्तकांचा संच स्मृतीचिन्हासह दिला जाईल.

मंथन वेलफेअर फाऊंडेशन संचलित

मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा (M.G.K.E.) - 2025

## Application Form प्रवेश अर्ज

परीक्षा : दि. 02/02/2025

**Instructions for filling form :**

1) This form should not be crushed or folded.
2) Form fill in capital letters.
3) All fields are mandatory.
4) For exam process parents WhatsApp Mobile number is necessary if available.

**फॉर्म भरण्यासाठी सूचना :**

१) फॉर्म चुरगळू नये किंवा घडी घालू नये तसेच खाडाखोड करू नये.
२) फॉर्म फक्त इंग्रजी कॅपिटल अक्षरात भरावा.
३) सर्व रकाने भरणे अनिवार्य आहे. भ्रमणध्वनी क्रमांक आवश्यक आहे.
४) परीक्षेच्या पुढील प्रक्रियेसाठी उपलब्ध असल्यास पालकाचा व्हॉटस्अॅप भ्रमणध्वनी क्रमांक आवश्यक आहे. (नसल्यास इतर भ्रमणध्वनी क्रमांक द्यावा.)

Student Full Name विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव

First Name नाव | Middle Name वडिलांचे नाव | Surname आडनाव

योग्य चौकटीत ☑ अशी खूण करावी. Put a ☑ mark in applicable box.

Standard इयत्ता :- 1st ☐ 2nd ☐ 3rd ☐ 4th ☐ 5th ☐ 6th ☐ 7th ☐ 8th ☐

Medium माध्यम :- Marathi मराठी ☐ English इंग्रजी ☐ Semi-English सेमी-इंग्रजी ☐

(इयत्तेची व माध्यमाची अचूक नोंद करावी, यामध्ये फॉर्म जमा केल्यानंतर कोणताही बदल होणार नाही.)

Date of Birth जन्मतारीख ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ Mother's Name आईचे नाव :- ____

Parent Mobile No. पालकाचा मो.नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ (WhatsApp असलेला आवश्यक)

School Name शाळेचे नाव

____

| School address शाळेचा पूर्ण पत्ता | Parent address पालकाचा पूर्ण पत्ता |
|---|---|
| Post : | Post : |
| Taluka : District : | Taluka : District : |
| Pin Code : | Pin Code : |
| Email ID : | Email ID : |

### पालकाचे प्रतिज्ञापत्र / Parent's Declaration

मी या प्रवेश अर्जाच्या माध्यमातून माझ्या पाल्याचा **'मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा' (MGKE)** ह्या खाजगी परीक्षेस प्रवेश त्याच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी स्वखुशीने घेत आहे. या परीक्षेचा काठिण्यस्तर शालेय अभ्यासक्रमास पूरक असून या अभ्यासक्रमामुळे परीक्षार्थी वर अभ्यासाचा कोणताही अतिरिक्त ताण पडणार नाही, त्याच्या दैनंदिन शालेय वेळापत्रकात बदल होणार नाही आणि त्याच्या शालेय दप्तराच्या ओझ्यात वाढ होणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच शैक्षणिक व्यवस्थेशी संबंधित असणारा कोणताही शासकीय घटक परीक्षेस जबाबदार राहणार नाही हे मला ज्ञात आहे. माझ्यावर माझ्या पाल्याबाबत परीक्षेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा सक्ती नसून परीक्षा ऐच्छिक स्वरूपाची आहे हे मला माहित आहे. परीक्षा पूर्वतयारीसाठी अवांतर पुस्तके खरेदी करण्यास मला प्रोत्साहित केले नाही. परीक्षाविषयक सर्व हक्क मंथन वेलफेअरकडे राखून आहेत (परीक्षा रद्द करणे, अभ्यासक्रम स्वरूप ठरवणे, परीक्षा शुल्क, बक्षिसांबाबतचा निर्णय इत्यादी परीक्षेची निगडीत सर्व विषयाचे हक्क) याची मला संपूर्ण जाणीव आहे. परीक्षेसंदर्भातील सर्व नियम व अटी (मागील पानावरील) तसेच परीक्षा व्यवस्थापनाने वेळोवेळी बदललेले निर्णय मला पूर्णतः मान्य आहेत व ते माझ्यावर (पालक व विद्यार्थी) बंधनकारक असतील.

ठिकाण / Place ____ पालकाची स्वाक्षरी



दिनांक / Date ____ पालकाचे नाव ____

### ✲ परीक्षा फॉर्म फी पोहोच पावती / Acknowledgment

**मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा (M.G.K.E.) - 2025**

आवेदन पत्रावरील नियम व अटी मान्य असलेले उल्लेखित क्रमांकाचे आवेदन पत्र व प्रवेश शुल्क रू. पन्नास फक्त मंथन वेलफेअर फाऊंडेशन संचलित मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेकरिता संबंधित परीक्षार्थीच्या पालकाकडून प्राप्त झाले.

परीक्षा : दि. 02/02/2025

अधिकृत समन्वयकाची सही

(काही अपरिहार्य कारणांमुळे परीक्षा स्वरूप, पेपर वेळापत्रक व परीक्षा तारखेत बदल होऊ शकतो. )